# बृहन्मुंबई महानगरपालिका

## आपत्कालीन व्यवस्थापन विभाग

### पावसाळी परिस्थितीचा अहवाल

### ४ ऑगस्ट ते ५ ऑगस्ट २०१९ सकाळी ८:०० ते ८:०० (२४ तास)

१. पाऊस:

| स्थळ | २४ तासांचा पाऊस (मिमी) | ४ ऑगस्ट २०१९ पर्यंतचा एकूण पाऊस (मिमी) | वार्षिक सरासरी पाऊस (मिमी) | २०१९ पावसाची टक्केवारी | ४ ऑगस्ट २०१८ पर्यंतचा एकूण पाऊस (मिमी) | २०१८ पावसाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| कुलाबा | १२.२ | १७५४.४ | २२०३ | ७९.६% | १५६२.१ | ५०.३४% |
| सांताक्रुझ | ६१.६ | २४३५.८ | २५१४ | ९६.८% | १९५२.१ | ५७.८८% |

२. मनपाच्या स्वयंचलित केंद्रांवर नोंदविण्यात आलेला सरासरी पाऊस:

| विभाग | २४ तासांचा पाऊस (मिमी) | ४ ऑगस्ट २०१९ पर्यंतचा एकूण पाऊस (मिमी) | शहर व उपनगरातील सरासरी पाऊस (मिमी) | मुंबईत झालेला एकुण सरासरी पाऊस (२३५८) (मिमी) |
|---|---|---|---|---|
| शहर | ३०.२ | १७८२.६ | ८०.९% | ८८.६% |
| पूर्व उपनगरे | ५१.७ | २३०७.३ | ८९.१% | |
| पश्चिम उपनगरे | ७४.२ | २१७७.२ | | |

३. तापमान:

| स्थळ | कमाल | किमान |
|---|---|---|
| कुलाबा | २७.६ | २४.० |
| सांताक्रुझ | २७.५ | २४.० |

४. समुद्राची भरती:

| दिनांक | भरतीची वेळ | लाटांची उंची | दिनांक | ओहोटीची वेळ | लाटांची उंची |
|---|---|---|---|---|---|
| ०५.०८.२०१९ | दुपारी ३:१४ | ४.६५ मी. | ०५.०८.२०१९ | रात्रौ ९:१८ | ०.८७ मी. |
| ०६.०८.२०१९ | मध्यरात्री ३:२९ | ४.१५ मी. | ०६.०८.२०१९ | सकाळी ९:१४ | १.२१ मी. |
| ०६.०८.२०१९ | सायं. ४:०० | ४.३५ मी. | ०६.०८.२०१९ | रात्रौ २२:०७ | ०.९९ मी. |

५. हवामान अंदाज : कुलाबा वेधशाळेने पुढील २४ तासांकरिता वर्तविलेल्या अंदाजानुसार मुंबई शहर व उपनगरात काही ठिकाणी अधुनमधून पावसाच्या सरी पडणाच्या शक्यता असून काही सरी जोरदार असतील.

६. **पाणी साचणे : निरंक**

७. **घर पडल्याच्या तक्रारी** : शहरात ३ आणि पुर्व उपनगरात ८ आणि पश्चिम उपनगरात ८ अशा एकुण १९ ठिकाणी घराचा / भिंताचा भाग पडल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या. सदर तक्रारी संबंधीत यंत्रणा व विभागांस कळविण्यात आल्या आहेत. मार नाही.

८. **दरड कोसळणे : निरंक**

९. **शॉर्टसर्किट** : शहरात ९, पूर्व उपनगरात ७ आणि पश्चिम उपनगरात १४ अशा एकुण ३० ठिकाणी शॉर्टसर्किट होण्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या. सदर तक्रारी संबंधित विद्युत पुरवठा यंत्रणांना कळविण्यात आल्या आहेत. मार नाही.

१०. **झाडे पडण्याच्या तक्रारी**: शहरात २२, पूर्व उपनगरात ७२ आणि पश्चिम उपनगरात ५१ अशा एकुण १४५ ठिकाणी झाडे/फांदया पडण्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या. सदर तक्रारी संबंधीत विभागांना कळविण्यात आल्या आहेत. मार नाही. दिनांक ०५.०८.२०१९ रोजी मध्यरात्री १२:११ वा. कुपर रुग्णालयातून प्राप्त माहितीनुसार हरे राम हरे कृष्ण मंदिर, जुहू पोलीस ठाण्याजवळ, अंधेरी (प) या ठिकाणी झाड पडून श्री. जयदास, वय ३९ वर्षे यांच्या डोक्याला व पाठीला मार लागला. उपचारार्थ त्यांना कुपर रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

११. **वाहतुक व्यवस्था : (आज सकाळी ९:०० वा. प्राप्त माहितीनुसार)**

- **मध्य रेल्वे** : वाहतूक सुरळीत सुरु आहे
- **पश्चिम रेल्वे**: वाहतूक सुरळीत सुरु आहे
- **हार्बर रेल्वे**: वाहतूक सुरळीत सुरु आहे
- **बीईएसटी**: वाहतूक सुरळीत सुरु आहे.

१२. **विशेष माहिती: दिनांक ४ ऑगस्ट २०१९ रोजी सकाळी ११:३३ वा. पोलीस नियंत्रण कक्षाकडून प्राप्त माहितीनुसार राजीव गांधी नगर, धारावी बस आगाराच्या जवळ, धारावी येथे रहाणारा मोहम्मद महबुब उर्फ राजा मोहम्मद मजार शेख, वय २० वर्षे हा प्रात:विधी करीता गेलेला मुलगा परत न आल्यामुळे स्थानिकांच्या सांगण्यानुसार सदर मुलगा खाडीत पडला असावा म्हणून धारावी खाडीत शोधकार्य सुरु करण्यात आले. सायं. उशिरापर्यंत मुलाचा शोध न लागल्यामुळे अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळाचा ताबा स्थानिक पोलीसांकडे दिला.**

**२) निर्मलनगर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरिक्षक श्री. देशमुख यांच्याकडून प्राप्त माहितीनुसार सहयोग सहजीवन प्रगती मंडळ, राजे संभाजी विद्यालयाजवळ, गोळीबार रोड, सांताक्रुझ (पू) या ठिकाणी घरात भरलेल्या पाण्यामुळे दरवाजात उतरलेल्या इलेक्ट्रिक करंटचा शॉक लागलेल्या श्रीमती माला भुमन्ना नागम, वय ५२ वर्षे व संकेत भुमन्ना नागम, वय २६ वर्षे यांना व्हि एन देसाई रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले. व्हि एन देसाई रुग्णालयातून प्राप्त माहितीनुसार दोघांचाही रुग्णालयात दाखल करण्यापूर्वीच मृत्यु झाला असल्याचे घोषीत करण्यात आले.**

====